**श्री सत्यनारायणाची आरती**

जय जय दीनदयाळ सत्यनारायण देवा ।
पंचारति ओवाळूं श्रीपति तुज भक्तिभावा ।। धृ।।
विधियुक्त पूजुनी करिती पुराण श्रवण ।
परिमळद्रव्यांसहित पुष्पमाळा अर्पून ।।
घृतयुक्त शर्करामिश्रित गोधूमचूर्ण ।
प्रसाद भक्षण करितां प्रसन्न तूं नारायण ।। जय ।। १।।
शतानंद विप्रें पूर्वीं व्रत हें आचरिलें ।
दरिद्र दवडुनि अंतीं त्यातें मोक्षपदा नेलें ।।
त्यापासुनि हें व्रत या कलियुगिं सकळां श्रुत झालें ।
भावार्थें पूजितां सर्वां इच्छित लाधलें ।। जय ।। २।।
साधुवैश्यें संततिसाठीं तुजला प्रार्थियलें ।
इच्छित पुरतां मदांध होऊनि व्रत न आचरिलें ।।
त्या पापानें संकटिं पडुनी दु:खहि भोगिलें ।
स्मृति होऊनि आचरितां व्रत त्या तुवांचि उद्धरिलें ।। जय ।। ३
प्रसाद विसरुनि पतिभेटीला कलावती गेली ।
क्षोभ तुझा होतांचि तयाची नौका बुडाली ।।
अंगध्वजरायाची यापरि दु:खस्थिति आली ।
मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णीं परिसली ।। जय ।। ४।।
पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं ।
पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं ।।
अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनि ।
ऐसा भक्तां संकटिं पावसि तूं चक्रपाणी ।। जय ।। ५।।

अनन्यभावें पूजुनि हें व्रत जे जन आचरति ।
इच्छित पुरविसी त्यांतें देउनि संतति संपत्ती ।।
संहरती भवदुरितें सर्वहि बन्धनें तुटती ।
राजा रंका समान मानुनि पावसी श्रीपती ।। जय ।। ६ ।।
ऐसा तव व्रतमहिमा अपार वर्णूं मी कैसा ।
भक्तिपुरस्सर आचरती त्यां पावसि जगदीशा ।।
भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तूं सर्वेशा ।
मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ।। जय ।। ७ ।।